




— मायदेव

मूल्य आठ आणे


IRBK-0104101

IRBK-0104101

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें

विषय बाल. वा.

दा. क्र. ४909

अ. क्र. २८८३८
वर्गवारी:
२०८
३-८-६




# छंदगीत

वासुदेव गोविंद मायदेव

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. 6909 नों. दि. ............
वि. बा.वा. क्र. ............

IRBK-0104101
IRBK-0104101

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य आठ आणे

सर्वाधिकार सुरक्षित

प्रथमावृत्ति : १९५२

मुद्रक : बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २
प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई ४

मुलांमुलींनो,

**अभिनयगीत, शिशुगीत, बालविहार, किलबिल** व **क्रीडागीत** ह्यांसारखेंच हें **छंदगीत** आज तुमच्या हातीं देत आहें. छंद म्हणजे नाद, हौस, आवड. ह्यांतील सर्व गाणीं तुमच्या आवडीनावडी पाहूनच मला सुचलीं आहेत. मला वाटतें तीं तुम्हांला आवडतील.

ह्या पुस्तकांतील चित्रें तुमच्या ओळखीचे चित्रकार केळकरकाका ह्यांनीं काढलीं आहेत. ह्या पुस्तकांतील गाण्यांच्या चाली तुमच्या माहितीच्या आहेत म्हणून त्यांची सारीगम ह्या खेपेस दिलेली नाहीं.

**वा. गो. मायदेव**

मुंबई, ११ ऑक्टोबर १९५२

## अनुक्रम



| | | | |
|---|---|---|---|
| १. प्रार्थना | ... | ... | १ |
| २. उगि म्हणजे कैसा राहूं ? | ... | | ३ |
| ३. निळू आणि लिलू | | ... | ५ |
| ४. पोपटलाल | ... | ... | ७ |
| ५. होडी | ... | ... | ८ |
| ६. पाहुणा | ... | ... | १० |
| ७. कधीं जायचें पुण्यास आपण ? | | | १३ |
| ८. बाहुलीस | ... | ... | १५ |
| ९. मोटरवाल्यांस ! | | ... | १६ |
| १०. कधिं मोठा म्हणणार ? | | ... | १८ |
| ११. हा पाउस चाले रात्रभरी ! | | | २० |
| १२. सहल | ... | ... | २२ |
| १३. होऊं देच भांडाभांडी ! | | .... | २४ |
| १४. जलांत टाकिं या उडी ! | | ... | २६ |
| १५. पट्ठे बापूराव ! | | ... | २८ |
| १६. मौज ! | ... | ... | ३० |
| १७. टिपू | ... | ... | ३२ |

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम
विभाग
क्रमांक 2104
नों. दि. 3-

# छंदगीत

## १ प्रार्थना !

[ चाल—राम स्मरावा राम सारखी ]




अम्हांला देवा इतुकें दे ! ॥ ध्रु० ॥

साखरझोंपेंतून अम्हांला
कुणिहि न उठवूं दे १

फिरावयाला रोज कुणितरी
आम्हां नेऊं दे २

चिंचआंवळे वाटेमधिं कुणि
पाडुन देऊं दे ३


कुणि घरिं येतां आम्हांसाठीं
खाऊ आणूं दे ४

वाचनलेखन कधिं खेळाच्या
आड न येऊं दे ५

ओरडल्याविण अंगावरतीं
कुणिही शिकवूं दे ! ६

# २ उगि म्हणजे कैसा राहूं ?

[ चाल – फटक्याची ]



"दादांच्यापरि गमे लिहावें टांक ठोकळा घेऊन
शाइ सांडशिल म्हणुनि उचलुनी देती वरतीं ठेवून १

ताईपरि मज
गमे शिवावें
कोरें कापड घेऊन
कापुन घेशिल
म्हणुनि हातिंची
कातर घेती काढून २






आईपरि मज
गमे करावा चहा
शेगडी पेटवुन
दूर बैस बघुं
म्हणुनी घेती
आगपेटिही हिसकून

टांक मोडशिल, बोट कापशिल, भाजशील, उगि बस पाहूं
अशींच सारीं कशीं बोलती ? उगि म्हणजे कैसा राहूं ?"

# ३ निळू आणि लिलू !

[ चाल — चंद्रकांत ]



‘ मोठा होल्यावरी लिलू मी सायकल घेणार
आणि ऐटिनें बसून वरतीं शाळे जाणार ! ’

“ मोठी होल्यावरी निळू मी साडी घेणार
गोल नेसुनी बूट घालुनी सभेस जाणार ! ”


‘ मोठा होल्यावरी लिलू मी झेंडा घेणार
भारत झिंदाबाद म्हणूनी अस्सा जाणार ! ’

" मोठी होल्यावरी निळू मी पेटी घेणार
द्याहो पैसा पैसा म्हणुनी फंड मागणार ! "

' मोठा होल्यावरी लिलू मी लगीन करणार
आहें लगीन करणार ! '

" मोठी होल्यावरी निळू मी नौरी होणार
लाजरी नौरी होणार !! "

# ४ पोपटलाल !



डाळिंबाच्या फुलावाणी
चोंच तुमची लाल
भरली वाटी ! प्याना पाणी
प्यारे पोपटलाल !

# ५ होडी


[ चाल – नऊ वाजले ]



" मला एक नी शशिला दुसरी दादा ! होडी करुनी द्या
म्हणजे आम्ही त्यांत बसोनी कोकणांत घरिं जाउं उद्यां

आई, भाऊ, बाळ नि मोत्या मंजुळेसही नेणार
पुऱ्या, लोणचें, लाडू, चिवडा डब्यांत भरुनी घेणार

बॅगेमध्यें शशिचे माझे कपडे सगळे घालीन
ऐटिंत ऐशी बॅग उचलुनी होडिंत आणुन ठेवीन



होड्या अमुच्या समुद्रांतुनी
जातां बोटी दिसतील
छोटे अमुचे रुमाल सगळे
हात हलवतां बघतील



रोंग्या अमुचा बंदरावरी
ओझीं नेण्या येईल
मला नि शशिला खांद्यांवरतुन
घेउन कांठीं जाईल

पळत पळत मग मावशिपाशीं जातां येइल काय मजा !
—झाली होडी एक ? चला घ्या कागद हातीं अतां दुजा !

पाउस पण या होड्यांसाठीं आभाळांतुन पडेल ना ?
आणिक त्या चालवण्यासाठीं पाणी अंगणिं जमेल ना ? ”

# ६ पाहुणा !

[ चाल – माझ्या मामाची रंगित गाडी हो ]



कुणि घरांत पाहुणा
आला हो ॥ ध्रु० ॥
किति सकाळिं धांदल
झाली हो
कशि धांवुन सगळीं
जमलीं हो
अणि घेण्या पुढेंहि
झालीं हो
किति वांकून वांकून
हंसत होतीं पाहून
परि मला न कोणी
उचली हो ॥ १ ॥



त्या न्हाया पटकन
नेती हो
कुणि तेलहि घेउन
येती हो
अणि लावुन रडतां
हंसती हो
कशि रागावति ना
मुळिंही हो
डोळां काजळ घालुन
गालीं बोट लावून
कशिं भोंवति सारीं
बसती हो ॥ २ ॥

तो उठतां त्याला
घेती हो
कुणि हात नि बोटें
बघती हो

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

कुणि पापे घेतच
बसती हो
कुणि कुर्र करोनी
पळती हो



कपडे नवे घालून
जवळ घेती गुंडून !
मामाला कुणिहि न
पुसती हो ! ॥ ३ ॥


# ७ कधीं जायचें पुण्यास आपण ?

[ चाल – फटक्याची ]



“ कधीं जायचें पुण्यास आपण ? सकाळ केव्हां होईल ?
पेटि वळकटी रामा अपुली खालीं केव्हां नेईल ?
कधीं जायचें पुण्यास आपण ? केव्हां घोडा चालेलं ?
स्टेशन बोरीबंदर लौकर केव्हां आतां येईल ?
कधीं जायचें पुण्यास आपण ? हाता आई धरशिल ना ?
डब्यांत खिडकीपाशीं जागा मला बसाया देशिल ना ?

कधीं जायचें पुण्यास आपण ? कशी निघेना गाडी ही ?
सुटली गाडी !—काढायाचा अतांच ना लाडू आई ?
कधीं पुण्याला पोंचूं आपण ? आला कर्जतचा चिवडा ?
खंडाळें बघ आलें ! घेऊं करवंदांचा एक पुडा ?
कधीं पुण्याला पोंचूं आपण ? गाडी केव्हां थांबेल ?
मास्तरांस मी तिकिटें देइन, माझ्या हातीं देशील ?



आलों का हे पुण्यास आपण ? टांगा आला काय घरा ?
कधीं मुंबइस परतायाचें आई आधीं सांग जरा !! ”

## ८ बाहुलीस



बघते नुसती ! उघड तोंड

बोल चुरूचुरू !

उभी नुसती ! उचल पाय

चाल तुरूतुरू !

# ९ मोटरवाल्यांस !

[ चाल – घटका गेली पळें गेलीं या सुरावर ]




" इथें कशाला थांबवितां ह्या गाड्या मोटरवाल्यांनो !
म्हणत कसे तुम्हि कधींहि नाहीं चला मुंबइस बाळांनो ?

भिकू सांगतो असे मुंबई फारच मोठी किती जरी
बघणें आहे मोठी किति ती खोपोलीहुन असे तरी !

किशी सांगते समुद्र म्हणजे मोठा पाण्याचा सांठा
अम्हां पाहणें खराच का तो असे तलावाहुन मोठा ?

हुसेन म्हणतो समुद्रांत त्या पळती बोटी भराभरा
पाटांतिल कागदहोड्यांहुन पळतिल का त्या झराझरा ?

भिवा सांगतो घरें तेथचीं असतीं मोठीं मजल्यांचीं
किसनशेटच्या हवेलीहुनी असतिल मोठीं परि कैचीं ?

अम्हां पाहणें वाघ माकडें हरिण कसे ते एकत्र
शांत राहती भांडणाविना राणीच्या त्या बागेंत !

अम्हांस आहे बागेची त्या राणिहि बघणें ! दिसेल ना ?
—निघतां ? कळवा अमुचें येणें मुंबईतल्या बाळांना !"

# १० कधिं मोठा म्हणणार ?

[ चाल—तूं माझा यजमान सारखी आरंभीं ]



" कधिं मोठा म्हणणार
मला तूं कधिं मोठा म्हणणार ?
अन् आई मज हवें तसें
तूं कधिं वागूं देणार ? ॥ ध्रु० ॥


पट्ट्यामध्यें पिस्तुल रोखुन
तिरपी टोपी ऐटिंत चढवुन
तीनचाकिवर पोलिस होउन
गांवभरी फिरणार । कधीं मी गांवभरी फिरणार ? १

शिरून लगबग दुकानामधीं
काढा माहिम-हलवा आधीं
सांगी ऐशी देउन जलदी
झोंकामधिं बसणार। कधीं मी झोंकामधिं बसणार ? २

कधिं काळीं जर मागायाला
कुणी आंधळा मुलगा आला
झटकन आणा देउन त्याला
हंसतांना बघणार। कधीं मी हंसतांना बघणार ? " ३

# ११ हा पाउस चाले रात्रभरी !

[ चाल – कुणि कोडें माझें सारखी ]



“ हा पाउस चाले रात्रभरी
कधीं पाउलें पत्र्यावरतीं
सारखिं टाकित राही हा किति
टप्प टप्प तीं निजल्यां उठविति
पळ चाळा थांबवि हा न तरी १


कधिं बाहेरी करि हा घाई
आणखि भरभर चालत राही
कुठून झिमझिम कानीं येई
अशि धडपड याची दूरवरी २

कधिं वाटे हा धूम ठोकतो
धो धो रपरप नाद उठवितो
गरिबां भिजवायास धांवतो
हा खट्याळ हांसत अंधारीं ३

याच्या खोड्यांना कंटाळुन
पांघरूण मी घेतों ओढुन
आइबाप या कसेंच कोणि न
बोलून निजविती निचळ घरीं ?” ४

# १२ सहल !

[ चाल – फटक्याची ]



‘ सुटी अम्हांला उद्यां दुपारीं; पर्वतीस अम्हि जाऊं का ? ’
“ जा ना ! तुमच्या बरोबरी पण मोठीं कोणी नकोत का ? ”

‘ नकोत; काणे, सुर्वे, भोळे जाऊं सारे बरोबर ’
“ सोडतील पण कोण तुम्हांला नीट आपुल्या घरोघर ? ”

‘ शाळेपाशीं आम्ही परतूं; तेथुन येऊं नीट घरा ’
“ ठीक, परी या लिलीबरोबर हळु चालाया हवें जरा ”

‘ काय बरोबर देशिल आई ? दुसरे कांहीं आणतिल ! ’
“ करून देऊं झुणका ? दशम्या गूळ तुम्हांला चालेल ? ”

‘ दे, दे ! काणे आणिल सांजा, सुर्वे शेंगा आणील ’
“ भोळ्याची ना आई येथें, त्यासाठीं तूं नेशिल ? ”

‘ हो, हो, नेइन दोस्त असे तो ! वाचितसे तो तरी किती ! ’
“ तर मग त्याला पर्वतीवरी पुसा मराठ्यांच्या गमती ! ”

‘ ऐकूं गोष्टी, उडूं बागडूं, चढुं पाहूं, गाणीं गाऊं
खुल्या पांखरांपरी फिरोनी खिदळत सहलीहुन येऊं !! ’

# १३ होऊं देच भांडाभांडी !

[ छंद – दीर्घाक्षरी ]



'मोत्या आमचा पाहून सारे लोक घाबरती
कुत्रा आहे, आंत येऊं ? बाहेरून विचारती !'

"वाघ्या आमचा पाहून जरा येतात आवारीं
गुरगुर ऐकतांच — होती फाटकाबाहेरी !"

'बर्‍या, पाहिलास ना तूं मोत्या कसा पाठलाग
चिमण्यांचा कोंबड्यांचा करीतसे लगोलग ?'

" काळ्या, सांग, वाघ्यापुढें राहील का उभें कोण ?
न का क्षणीं उडवील कोणाचीही दाणादाण ? "

"" चला, पैज लावा ! पाहूं कोण हटवी कोणाला !
होऊं देच भांडाभांडी ! आणा मोत्या नि वाघ्याला ! ""



# १४ जलांत टाकिं या उडी !

[ चाल – तूं चाल पुढें तुजरे गड्या – सारखी ]



टाकिं कान्हया ! जलांत टाकिं या उडी
राहि कालिया इथेंच घेउनी बुडी ॥ ध्रु० ॥

भंवतींचें झाडझुडुप कोळपूं बघे
चट सारें पांखरूंहि येथुनी निघे
जीव सकळ घाबरून येतसे रडी ! १

मटकाविलिं किति यानें कंवळिं वांसुरें
चावुनिही किति दुभतीं मारिलीं गुरें
फुसकारुन पळवी हा राखते गडी ! २

गोपिका न कुणि धजती यावया इथें
स्नान धुणें राहियलें कोठच्या कुठें
म्हणुनि निघत तुजकडेच सर्व तांतडी ! ३

कांठिं उंच हा कदंब चढुनि त्यावर
न्याहाळुन दुष्टातें घेइं लौकर
घाबरून बघ लपतो देउनी दडी ४

दाणदिशीं मुटका दे खालिं फेकुनी
डोहिं कालियास टाक चेंदचेंदुनी
जग पाहो अमुचा हा मर्द संवगडी !! ५

# १५ पठ्ठे बापूराव !

[ चाल – गोजिरवाणी खार ]



कुडमुड कुडमुड ! पहा जात हे पठ्ठे बापूराव !
सवें घेउनी भागाबाई फिरती सगळा गांव ! ॥ ध्रु० ॥
जमोत पोरें थोरें भंवतीं
सदा धन्याची मर्जी बघती
तयेंच म्हणतां खेळ करिति हे असो कसाही ठाव ॥ १ ॥



खुर्चीवरतीं बसुन वाचतिल
टाळ वाजवुन भजनहि
करतिल
शिपाइ होउन दोंपायीं कांधें
चालतील भरधांव ॥ २ ॥

अनुक्रम 2993
क्रमांक 2208
नों. दि. 3-7

उलट्या सुलट्या उड्या मारुनी
दावितील कधिं कसरत करुनी
धन्यावरीही फुरगुटून कधिं उलटुन देतिल डाव ॥ ३ ॥




रुसली बाइल करण्या राजी
जातिल जवळी हे नवरोजी
भागाबाइस पोटीं धरुनी
किती दावितिल भाव ॥ ४ ॥

पण जर रागावुन हे गेले
मरणच तीचें मग ओढवलें
घेउन काठी डोइंत सजतिल घालायाही घाव ! ॥ ५ ॥

# १६ मौज !

[ चाल – सकाळ सुंदर सारखी ]



मौज सकाळीं होइल ग ऽ
किति मौज सकाळीं होइलग ऽ
परिजातकावरतिं फुलोरा
शुभ्र फुलोनी येइल ग ऽ ध्रु०

अंगाणिं येती जशीं पांखरें
मुलगे येतिल दारिं गोजिरे
मुलीहि हातीं परड्या घेउन
लगबग धांवुन जमतिलग ऽ १


पारिजातका बघुन हांसऱ्या
खुलतिल मुलगे मुली लाजऱ्या
गालिं तयांच्या आनंदानें
खळ्या कितितरी दिसतिल ग ऽ २

मुलगे फांद्यांवरतीं चढतिल
गदगद साऱ्या हालवतील
फुलांच्याच जणुं पावसांत मग
मुली भिजोनी निघतिल ग ऽ ३

गोड गळ्यानें गाउन गाणीं
फुलें भराभर घेतिल वेंचुनि
परड्या भरतां घरास सारीं
हांसत बोलत चलतिल ग ऽ ४

अनुक्रम 2-९-९३
विभाग का.वा.
क्रमांक 2908
नों. दि. 3-?-61

# १७ टिपू



सकाळपासून सांजपर्यंत
उघडें आमचें दार
करी पहारा सदैव दारीं
टिपू रखवालदार !

IRBK-0104101
IRBK-0104101